■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक ३८ ● मंगळवार, दि. १० ते १७ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

### ■ कुतूहल विज्ञान प्रदर्शनीने जिल्ह्यात इतिहास घडविला ■

# ४० हजार विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोनाची अनुभूती

**वाशिम, दि. ९ फेब्रुवारी (जिमाका) विज्ञान भारती, नागपूर व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ ते ८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित कुतूहल विज्ञान प्रदर्शनीला जिल्हाभरातून जवळपास ४० हजार विद्यार्थ्यांनी भेट दिली. या प्रदर्शनीमुळे विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित झाला असून, या उपक्रमाने वाशिम जिल्ह्यात इतिहास घडविला आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.**

स्थानिक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात दि. ८ फेब्रुवारी रोजी झालेल्या समारोपीय कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सतीन मेश्राम, आयएमए अध्यक्ष डॉ. वसंत खडतकर, विवस्वान हेंबाळकर, विज्ञान प्रदर्शनीचे उपाध्यक्ष डॉ. हरीश बाहेती, वाशिम अर्बन बँकेच्या अध्यक्षा श्रीमती शीलाताई राठी, कुतूहलचे मुख्य समन्वयक रोहित गनोरकर, विज्ञान भारतीचे नरेंद्र सातफळे, विदर्भ कोषाध्यक्ष गिरीश जोशी, शिक्षणाधिकारी मंगलताई धुपे- आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.

त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सन्मानचिन्ह व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकांचा गौरव करण्यात आला. यामध्ये विजय भड, ललित भुरे, संतोष गिर्हे, शैलेश चव्हाण, इमरान हुसेन, माधव ढोले, किशोर उंडाळ, सुशील अपूर्वा, मनीष गावंडे व राजेश वाघ यांचा समावेश होता. प्रदर्शनीच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे योगदान देणारे राजेश गोरुळे, सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमाणी, अॅड भारती सोमाणी, डॉ. संजय तोष्णीवाल, उद्योजक अभिषेक मुंदडा, उद्योजक शेखर बंग, अॅड. दीपक कलवार, राजेंद्र कलवार, नगरसेवक पुरणमल बदलानी तसेच शेलूबाजार अर्बनचे मोहित कर्नावट यांचा विज्ञान भारतीच्या वतीने सन्मान करण्यात आला.

तीन दिवसांच्या प्रदर्शनीदरम्यान शिस्तबद्ध नियोजन ठेवून सर्वाधिक विद्यार्थी उपस्थित ठेवणाऱ्या संस्थांना लक्ष्मीबाई गोरुळे संस्था व संस्थेचे अध्यक्ष राजेश गोरुळे यांच्या वतीने प्रत्येकी पाच हजार रुपयांचे रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यामध्ये श्री शिवाजी विद्यालय, वाशिम, लॉयन्स विद्यानिकेतन, वाशिम तसेच वाईगौळ, मानोरा येथील तपस्वी काशीनाथबाबा माध्यमिक आश्रम शाळेचा समावेश आहे. सामाजिक कार्यकर्ते अविनाश मारशेटवार यांच्या पुढाकारातून व वास्तुविशारद अर्चना मेहकरकर यांच्या सौजन्याने विज्ञान भारती टीम तसेच डॉ. सतीन मेश्राम, राजेश गोरुळे, सुरेश लोध, निलेश सोमाणी, भारती सोमाणी, सुनील काकडे, अॅड. सुरेश टेकाळे, वृशाली टेकाळे, चंदुभाऊ देशमुख मित्रमंडळ, दीपा वानखेडे, श्वेता, गजानन सेवाधारी मंडळ व राशी यांचा सत्कार करण्यात आला.

### सीपीआर प्रशिक्षणातून वाशिमचा राष्ट्रीय विक्रम – जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर



या प्रदर्शनीदरम्यान डॉ. हर्षाली जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सात हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना सीपीआर (हृदय-फुप्फुस पुनर्जीवन) प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमातून जिल्ह्याने राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. सीपीआर प्रशिक्षणात नियोजनबद्ध सहभाग घेणाऱ्या पंधरा विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक हजार रुपयांचे रोख पारितोषिक लक्ष्मीबाई गोरुळे संस्था व राजेश गोरुळे यांच्या वतीने जाहीर करण्यात आले. यावेळी अधिष्ठाता डॉ. सतीन मेश्राम यांनी, पहिल्या दिवशी अपेक्षेपेक्षा चारपट अधिक गर्दी झाल्याने काही प्रमाणात गैरसोय झाली असली तरी त्यामध्ये आयोजकांचा दोष नसून, त्यानंतरच्या दोन दिवसांत उत्कृष्ट नियोजन व बंदोबस्तामुळे कोणतीही तक्रार येऊ दिली नाही, असे स्पष्ट केले.

उपाध्यक्ष डॉ. हरीश बाहेती यांनी, कार्य करताना चुका होऊ शकतात; मात्र त्यातून शिकून अधिक सक्षम नियोजन केल्यास यश निश्चित मिळते, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमात नरेंद्र सातफळे, डॉ. वसंत खडतकर, विवस्वान हेंबाळकर तसेच डॉ. हर्षाली जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

विद्यार्थ्यांमधून कु. आंचल, कु. गार्गी काळे, निहारिका निषकाळजे व डॉ. राऊत यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. हरीश बाहेती यांनी केले. संचालन मृणाल वाकडे व प्राची राऊत यांनी तर आभार राजेश गोरुळे यांनी मानले. वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## वित्तीय साक्षरता सप्ताह २०२६ ची जनजागृती डिजिटल चित्ररथाला हिरवी झेंडी

### ■ सुरक्षित बँकिंगकडे पहिला टप्पा ■




वाशिम, दि. ९ फेब्रुवारी (जिमाका) सामान्य नागरिकांमध्ये आर्थिक व्यवहारांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, सुरक्षित व जबाबदार बँकिंगची सवय लागावी, या उद्देशाने वित्तीय साक्षरता सप्ताह २०२६ चे आयोजन दि. ९ ते १३ फेब्रुवारी या कालावधीत करण्यात आले आहे.

'सुरक्षित बँकिंग की ओर पहिला कदम' या संकल्पनेवर आधारित या सप्ताहाचा शुभारंभ जनजागृती प्रचार डिजिटल चित्ररथाला हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन भारतीय रिझर्व्ह बँक, नागपूरचे विकास अधिकारी हर्षल चितळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अग्रणी जिल्हा व्यवस्थापक यशवीर कुमार, जिल्हा विकास व्यवस्थापक शंकर कोकडवार, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सहाय्यक संचालक पंकज दिनवले, बँक ऑफ महाराष्ट्र वाशिमचे अमित वढेरा, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे मंगेश बोडाल्डे, बँक ऑफ इंडियाचे अविनाश सरकटे तसेच आयसीआयसीआय बँकेचे रूपेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते. वित्तीय साक्षरता सप्ताहाच्या माध्यमातून सुरक्षित बँकिंग व्यवहार, डिजिटल आर्थिक व्यवहारांतील खबरदारी, सायबर फसवणूक प्रतिबंध, बचत व आर्थिक नियोजन याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

प्रचार रथाच्या माध्यमातून शहर व ग्रामीण भागात जाऊन नागरिकांपर्यंत वित्तीय साक्षरतेचा संदेश पोहोचवण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## प्रभावी जनजागृतीच्यामुळे अल्पवयीन बालिकेचा बालविवाह रोखण्यात चाईल्ड हेल्प लाईनला यश

वाशिम,दि.९ फेब्रुवारी (जिमाका) मंगरूळपीर तालुक्यातील ग्राम पिंपळखुटा येथे होऊ घातलेला सोळा वर्षीय बालिकेचा बालविवाह वेळेत रोखण्यात आला. सदर बालविवाहबाबत चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकावर गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर बालिकेच्या वयाची तात्काळ खातरजमा करण्यात आली. यानंतर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी उत्तम शिंदे यांच्या आदेशानुसार सयुक्तपथक गठीत करण्यात आले.

त्यानंतर जिल्हा बाल सरक्षण अधिकारी भगवान ढोले, प्रकल्प समन्वयक अविनाश सोनुने यांच्या मार्गदर्शनाखाली रमेश वाघ, प्रतिभा घनसावंत व नीलिमा भोंगाडे यांनी घटनास्थळी भेट देऊन बालिका व तिच्या पालकाचे समुपदेशन केले. बालविवाहाचे कायदेविषयक परिणाम, आरोग्यविषयक धोके व मुलीच्या भवितव्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

समुपदेशनानंतर मुलीचे वय पूर्ण १८ वर्ष होईपर्यंत विवाह करणार नाही असे पालकाकडून लेखी हमीपत्र घेण्यात आले. त्यामुळे होऊ घातलेला बालविवाह यशस्वीपणे रोखण्यात आला.

या कारवाई साठी तालुका सरक्षण अधिकारी रुपेश सुरजुशे, ग्रामसेवक, सरपंच, अंगणवाडी सेविका यांचे मोलाचे सहकार्य लाभले. बालविवाह निर्मुलनासाठी चाईल्ड लाईन व महिला व बालविकास विभागाच्या सतर्कतेमुळे एका बालिकेचे बालपण आणि भविष्य सुरक्षित झाले आहे.

**बालविवाह ही गंभीर सामाजिक समस्या असून त्याचे परिणाम मुलींच्या आरोग्य, शिक्षण व सर्वांगीण विकासावर दीर्घकाळ परिणाम करणारे असतात. चाईल्ड हेल्पलाईन १०९८ च्या माध्यमातून मिळालेल्या गोपनीय माहितीवर तात्काळ कारवाई करून संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम केल्यामुळे हा बालविवाह वेळेत रोखता आला. जनजागृती, समुपदेशन आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी यामुळेच अशा घटनांना आळा घालणे शक्य आहे. नागरिकांनी अशा प्रकारची माहिती निर्भयपणे प्रशासनाला कळवावी, जेणेकरून प्रत्येक बालिकेचे बालपण व भविष्य सुरक्षित करता येईल.**

**उत्तम शिंदे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी**

# सरकारने उचललेले यशस्वी पाऊल

गेल्या दशकांमध्ये केलेल्या जनगणनेचा आढावा घेतल्यास महिलांची संख्या आणि त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सातत्याने घट होत असल्याचे दिसून येते. हरियाणा आणि पंजाबसारख्या सुशिक्षित आणि समृद्ध राज्यांमध्ये महिलांची संख्या दर हजार पुरुषांमागे ८५० पेक्षा कमी झाली आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की राज्य जितके अधिक शिक्षित आणि समृद्ध असेल तितके महिला लोकसंख्या प्रमाण कमी असेल. केरळ हा अपवाद आहे. तथाकथित मागासलेल्या ईशान्येकडील राज्यांमध्ये महिलांचे प्रमाण अधिक समृद्ध राज्यांपेक्षा लक्षणीयरीत्या चांगले आहे. काही सुशिक्षित आणि समृद्ध राज्यांमध्ये विवाहयोग्य पुरुषांना महिला शोधण्यात बरीच अडचण येत आहे. या पुरुषांना आता अविवाहित राहण्याची समस्या भेडसावत आहे. यामुळे त्यांच्या पालकांना मुलांसाठी उपवर मुली शोधण्यासाठी इतर राज्यांकडे वळावे लागत आहे. ही एक सामाजिक समस्या आहे. ही समस्या काही बुद्धिजीवी, सामाजिक कार्यकर्ते आणि सरकारी अधिकाऱ्यांसाठी चिंतेचा विषय होती. तथापि, त्यांचे मुलगे अविवाहित राहतील आणि वंश नष्ट होईल, या भीतीने लोकांना या समस्येवर उपाय शोधण्यास भाग पाडले आहे. त्यांना त्याची कारणे विचारात घेण्यास भाग पाडले गेले आहे. प्राचीन काळापासून भारतीय समाजात मुलांना खूप महत्त्व दिले गेले आहे. पालकांचा विश्वास आहे, की मुलाने पिंडदान (अंतिम संस्कार) केल्याशिवाय त्यांना स्वर्ग मिळत नाही.

महागाई कमी होती, तेव्हा लोक अनेक मुलांच्या संगोपन आणि शिक्षणाचा भार सहज पेलू शकत होते. तथापि, वाढत्या महागाईमुळे कुटुंबांना आपली मुले एक किंवा दोनपर्यंत मर्यादित ठेवावी लागली आहेत. लोक मुलगी नव्हे, तर मुलगा व्हावा यासाठी विविध युक्त्या वापरत आहेत. एके काळी भूतबाधा करणाऱ्या आणि जादूटोणा करणाऱ्यांची मदत घेणारे लोक आता गर्भाशयात लिंग निर्धारण चाचण्या करण्यासाठी वैज्ञानिक साधनांचा आधार घेत आहेत. पुरुषप्रधान समाजात महिलांना या घृणास्पद प्रथेमध्ये पुरुषांसोबत सामील होण्यास भाग पाडले जाते. महिला असूनही, त्या पुरुषांना स्त्रीभ्रूणहत्येमध्ये पाठिंबा देताना दिसतात. यामुळे जोडप्यांना स्त्रीभ्रूणहत्येपासून मुक्तता मिळू शकते; परंतु त्यांना या वाईट प्रथेच्या परिणामांची माहिती नसते. ते विसरतात, की पुढील काळात त्यांच्या मुलांना लग्न करण्यासाठी मुली उपलब्ध होणार नाहीत. या कृतीचा प्रतिकूल परिणाम म्हणजे सतत कमी होत जाणारी महिला लोकसंख्या. या समस्येचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे समाजाची पितृसत्ताक मानसिकता. ही मानसिकता मुला-मुलींच्या संगोपन, शिक्षण, वाढ आणि विकासाच्या संधींमध्ये दुहेरी मानके निर्माण करते. पालक अनेकदा मुलींच्या जन्मापासूनच त्यांचे संगोपन, काळजी आणि उपचार याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे त्यांच्या बाळांचा मृत्यू होतो किंवा त्यांचे आरोग्य बिघडते. मुलींचे शिक्षण आणि उच्च शिक्षण समाजात अनुकूलपणे पाहिले जात नाही आणि म्हणूनच त्यांना घराबाहेर पडण्याची परवानगी नाही. समाजात मुलींना ओझे मानले जाते. याचे कारण म्हणजे त्यांच्या लग्नाच्या वेळी हुंड्याची तरतूद. दुसरीकडे, मुलांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य दिले जाते. लहान वयात मुलींच्या आरोग्य आणि विकासाकडे लक्ष न दिल्यामुळे त्यांचा अकाली मृत्यू होतो. यामुळे लिंग असमतोल वाढतो. मुलींच्या अकाली मृत्यूचा परिणाम लगेच दिसून येत नाही. त्याचे परिणाम दहा ते बारा वर्षांनी दिसून येतात, जेव्हा त्याचे गंभीर स्वरूप समाज आणि सरकारसाठी चिंतेचा विषय बनते. बुद्धिजीवी आणि सरकारी यंत्रणा नंतर उपायांवर विचार करू लागतात. 'लाडली योजना', 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' आणि 'कन्या विद्याधन' यासारख्या सरकारी योजना या दिशेने सरकारने उचललेले यशस्वी पाऊल आहे.

# निशुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदु शस्त्रक्रियेचा लाभ घेण्याचे आवाहन

रिसोडः महाशिवरात्री निमित्त रिसोड येथे निशुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन १२ फेब्रुवारी २०२६ गुरुवारला करण्यात आले आहे

येथील ग्रामीण रुग्णालय सरकारी दवाखाना रिसोड येथे आयोजित या शिबिरा मध्ये मोफत नेत्र तपासणी व योग्य उपचार करण्यात येणार आहे. ज्या रुग्णांना मोतीबिंदू असेल त्या रुग्णाची लवकरात लवकर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

मोतीबिंदू शस्त्रक्रिया उदयगिरी लॉयन आय हॉस्पिटल उदगीर व जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम या



ठिकाणी करण्यात येणार आहे. मोतीबिंदू रुग्णांसाठी ऑपरेशन करिता ने-आन करण्याची तसेच राहण्याची आणि जेवणाची निशुल्क व्यवस्था समता फाउंडेशन मार्फत करण्यात येणार आहे नेत्र तपासणी करिता नोंदणी करण्यासाठी .मन्नालाल अग्रवाल स्किल डेव्हलपमेन्ट टेकनॉलॉजि निजामपूर व संत अमरदास अर्बन बँक बगडिया कॉम्प्लेक्स रिसोड येथे संपर्क करण्याचे आवाहन आयोजकाचे वतीने करण्यात आले आहे (वि. प्र)

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

वाशिम, दि. ९ फेब्रुवारी (जिमाका) आदिवासी विकास विभागातर्फे परदेशातील शैक्षणिक संस्थांत २०२६-२७ या वर्षात पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएडी अशा अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. त्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.

परदेशातील संबंधित शैक्षणिक संस्था जागतिक क्रमवारीत २०० च्या आत असावी. उमेदवार व उमेदवाराचे आई,वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावे. उमेदवाराच्या पालकांचे,कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न आठ लाखापेक्षा जास्त नसावे. विहीत निकषांनुसार पात्र विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास उत्पन्न मर्यादा १० लाखापर्यंत, तसेच विद्यापीठाची जागतिक क्रमवारी ३०० पर्यंत शिथील केली जाईल.

अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुज्ञेय लाभ, निवड कार्यपद्धती आदी माहिती आदिवासी विभागाच्या https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ऑनलाईन अर्जाव्यतिरिक्त इतर कोणत्याही पद्धतीने केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, असे आदिवासी विकास आयुक्त लीला बनसोड यांनी कळविले आहे.

# डॉ. एस. के. देशमुख यांना आयएसईईचा उत्कृष्ट वैज्ञानिक पुरस्कार प्रदान

**रिसोड :** येथील कृषी विज्ञान केंद्र, करडा येथील विषय विशेषज्ञ (विस्तार शिक्षण) डॉ. एस. के. देशमुख यांना भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या अंतर्गत कार्यरत इंडियन सोसायटी ऑफ एक्सटेंशन एज्युकेशन , नवी दिल्ली यांच्या वतीने दिला जाणारा 'कृषी विज्ञान केंद्रातील उत्कृष्ट वैज्ञानिक पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

हा प्रतिष्ठित पुरस्कार शेतकऱ्यांसाठी प्रभावी सल्ला सेवा, नाविन्यपूर्ण विस्तार उपक्रम, तसेच आधुनिक व शास्त्रशुद्ध कृषी तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल म्हणून दिला जातो.

डॉ. देशमुख यांनी संस्थेचे अध्यक्ष अनंतरावजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विज्ञान केंद्रामार्फत राबविलेल्या विविध विस्तार कार्यक्रमांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमता, उत्पन्नवाढ आणि तंत्रज्ञान स्वीकृतीत लक्षणीय सुधारणा झाली आहे.

गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या 'शाश्वत अन्न प्रणाली आणि आत्मनिर्भर भारतासाठी डिजिटल तंत्रज्ञान' या विषयावरील आयएसईई राष्ट्रीय चर्चासत्रात सदर पुरस्कार प्रदान करण्यात




आला. या सोहळयास भारतीय कृषी अनुसंधान परिषदेतील नामांकित शास्त्रज्ञ, विविध कृषी विद्यापीठांचे कुलगुरू तसेच आयएसईई सोसायटीचे अध्यक्ष डॉ. यू. एस. गौतम उपस्थित होते.

या पुरस्कारासाठी देशभरातील कृषी विज्ञान केंद्रांमधील नामांकित वैज्ञानिकांना नामांकन देण्यात आले होते. त्यातून कृषी विज्ञान केंद्राच्या पश्चिम विभागातून डॉ. एस. के. देशमुख यांची निवड करण्यात आली, ही बाब केंद्रासाठी अभिमानास्पद आहे.

डॉ. देशमुख यांच्या या यशामुळे कृषी विज्ञान केंद्र, करडा तसेच वाशिम जिल्ह्याच्या नावलौकिकात भर पडली असून, त्यांच्या कार्यामुळे इतर वैज्ञानिकांना देखील प्रेरणा मिळणार आहे. (वि. प्र)

# ग्रामीण भागातील क्रिकेट खेळाडु ते एमसीए क्रिकेट बोर्ड प्रशासक

## डॉ. श्रीराम गरकल संचालक यांचे प्रतिपादन

रिसोड : सेवानिवृत्त न्यायमुर्ती गोविंदराव आनंदराव सानप यांची नुकतीच महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या अध्यक्ष पदासाठी प्रशासक म्हणुन नियुक्ती झाल्या नंतर प्रथमच ते आपल्या मायभुमीत दाखल होताच, ग्रामस्थांच्या वतीने अभूतपूर्व स्वागत करण्यात आले, यावेळी संचालक डॉ. श्रीराम गरकल यांनी वरील गौरोउद्गार काढले,

सेवानिवृत्त न्यायमुर्ती गोविंदराव आनंदराव सानप यांची नुकतीच एमसीए च्या प्रशासक पदी नुकतीच निवड झाली, ही बाब वाशीम जिल्ह्यातील भर जहागीर चे



सुपुत्र या नात्याने जिल्ह्याच्या सरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. भर जहागीर हे सानप यांचे मुळ गाव आहे. ता. ६ फेब्रुवारीला रात्री ९ वाजता गोविंदराव सानप यांचे आगमन होताच ढोलताशाच्या निनाद गावातील मुख्यमार्गाने मिरवणूक काढण्यात आली. यावेळी एमसीए अध्यक्ष गोविंदराव सानप यांचे पुष्पहाराने स्वागत करतांनी श्री शिवाजी विद्यालयाचे संचालक डॉ. श्रीराम गरकल यांनी आपले विचार व्यक्त करतांनी सेवानिवृत्त न्यायमुर्ती गोविंदराव सानप हे भर जहागीर गावातील पहीले क्रिकेट खेळाडु होते. आज ग्रामीण भागातील क्रिकेट खेळाडु ते एमसीए क्रिकेट बोर्ड चे प्रशासकीय अध्यक्ष पदापर्यंत यशाला गवसणी घातल्याने नक्कीच महाराष्ट्रातील क्रिकेट ला चांगले दिवस येतील आशा प्रकारे विचार मांडले, तर सेवानिवृत्त पोलिस निरीक्षक दिपकराव बुधवंत यांनी सानप यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या, यावेळी सानप यांनी आपल्यातील कौशल्याचा लाभ क्रिकेट खेळासाठी नक्कीच समर्पित केल्या जाईल असे सांगीतले, यावेळी तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर, नितीन घुगे, मंडाळीधिकारी समाधान जावळे, तलाठी आर. पी. जाधव, विश्वनाथ पाल्वे, भगवान सानप, महादेव घुगे, अंकुश सानप, भानुदास गीते, भगवान गरकळ, प्रफुल्ल सांगळे, आदीनाथ सानप, गोरखनाथ सानप, पोलिसांच्या ताफ्यासह गावातील मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ उपस्थित होते. ता. प्र.

**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)



# श्रीकृष्ण कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन

## महाशिवरात्री निमित्त संत अमरदास बाबा संस्थान येथे धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल

रिसोड : येथील श्री संत अमरदास बाबा संस्थान मध्ये महाशिवरात्रीनिमित्त श्रीकृष्ण कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ ते १६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत करण्यात आली आहे

श्रीकृष्ण कथा ज्ञानयज्ञ कथेच्या प्रवक्त्या विदर्भ कन्या श्री श्री ज्ञानेश्वरी दीदी आर्वी ह्या राहणार असून संस्थान मध्ये दुपारी १ ते ५ पर्यंत हे संगीतमय श्रीकृष्ण कथा संप्पन्न होत आहे यानिमित्त संस्थांन मध्ये आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ ला रात्री९ते ११ श्री चा ब्रह्म वृंदाकडून रुद्राभिषेक व श्रीची महाआरती होईल १५ फेब्रुवारी २०२६ सायंकाळी ६ वाजता सिद्धेश्वर पालखी नगरप्रदक्षणा,असून १६ फेब्रुवारी २०२६ ला श्री संत अमरदास बाबाची नगर परिक्रमा पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेआहे या सप्ताहात दिनांक ९ फेब्रुवारी२०२६ ते १५ फेब्रुवारी २६ पर्यंत संस्थांन मध्ये कीर्तनाचे आयोजन करण्यात आलेआहे यामध्ये ९ फेब्रुवारी ह भ प सत्यनारायण महाराज कष्टे शेलगाव देशमुख, दिनांक १० फेब्रुवारी २०२६ ह भ प विनोदाचार्य कृष्णा महाराज मोकाशी संभाजीनगर,बुधवार ११ फेब्रुवारी २६ प्रेममुर्ती हभप श्री माधव महाराज इंगोले आळंदी देवाची,गुरुवार दिनांक १२फेब्रुवारी ह भ प विष्णु महाराज गव्हाणे स्वरमूर्ती सिद्धांत आश्रम वरवंड, शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ हभप मीराताई काळुबाई काळवाघे पुणे,शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ हभप ज्ञानयोगी मोहन महाराज सिद्धांत आश्रम वरवंड तसेच रविवार १५ फेब्रुवारी २०२६ ला श्री श्री ज्ञानेश्वरी दीदी आर्वी यांचे कीर्तन होणार असून सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ ला सकाळी ११ वाजता जानकी श्रीजी शास्त्री आर्वी जिल्हा वर्धा यांच्यातर्फे गोपालकाला कीर्तन आयोजित करण्यात आलेआहे (वि. प्र)

### १६ फेब्रुवारीला पालखी परिक्रमा होणार

सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ ला सकाळी श्री ची पालखी परिक्रमा संपन्न होणार असून दुपारी संस्थान कार्यालयात ३ ते ९ पर्यंत भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तरी जास्तीत जास्त भाविक भक्तांनी या सप्ताहात आयोजित सर्व धार्मिक कार्यक्रमाचे तसेच महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन अध्यक्ष व विश्वस्त मंडळ श्री संत अमरदास बाबा संस्थान श्री सिद्धेश्वर संस्थान रिसोड यांच्यातर्फे करण्यात आले आहे



# अखेर व्याड ते चिखली रस्त्याचा प्रश्न मार्गी

## ॲड. नकुल देशमुख यांच्या पाठपुराव्याची दखल

रिसोड : रिसोड तालुक्यातील व्याड ते चिखली या अत्यंत महत्त्वाच्या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामास अखेर प्रारंभ झाला असून, त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून त्रस्त असलेल्या वाहनचालक व नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. हा प्रश्न मार्गी लावण्यात भाजपचे युवा नेते ॲड. नकूलदादा देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने यश आले आहे.

व्याड-चिखली रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत होता. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिकच बिकट होत होती. खड्ड्यांमुळे वाहने उसळणे, किरकोळ अपघात होणे, रुग्णवाहिका व शालेय वाहनांना अडचणी येणे, अशी गंभीर स्थिती निर्माण झाली होती. या समस्येबाबत व्याड व चिखली परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती. व्याड येथील नागरिकांनी सुरुवातीला लोकप्रतिनिधींकडे रस्ता कामासाठी निधी देण्याची मागणी केली होती. परंतु, लोकप्रतिनिधींकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याने व्याड येथील नागरिकांनी माजी जिल्हा परिषद सदस्य स्वप्नील सरनाईक यांच्याकडे धाव घेतली. रस्त्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी स्वप्नील सरनाईक यांनी व्याड येथील नागरिकांचे शिष्टमंडळ घेऊन भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी खासदार अनंतराव देशमुख व युवा नेते ॲड. नकुल देशमुख यांची रिसोड येथे भेट घेतली व रस्त्याच्या दुरवस्थेबाबत सविस्तर माहिती दिली. हा प्रश्न तात्पुरता नव्हे तर कायमस्वरूपी सोडवावा, अशी आग्रही मागणी त्यांनी यावेळी केली. या मागणीची गंभीर दखल घेत माजी खासदार अनंतराव देशमुख व ॲड. नकुलदादा देशमुख यांनी तत्काळ वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा सुरू केला. संबंधित विभागांशी समन्वय साधून रस्त्यासाठी पुरेसा निधी मंजूर करून घेतला. त्यांच्या प्रभावी हस्तक्षेपामुळे व्याड-चिखली रस्त्याचा प्रश्न अखेर निकाली निघाला असून प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे. ता.प्र.

### एक महीन्यात काम पूर्ण होण्याची शक्यता

या प्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य स्वप्नील सरनाईक, संतोष वानखडे, चिखलीचे माजी सरपंच गौतम भगत, व्याडचे उपसरपंच रामभाऊ बोरकर, गौतम वानखडे, गायकवाड, अंभोरे यांच्यासह व्याड व चिखली परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ( एका महिन्यात काम पूर्ण होण्याचा अंदाजया रस्त्याचे काम येत्या एका महिन्यात पूर्ण होण्याची शक्यता असून, यामुळे शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांचा दैनंदिन प्रवास सुरक्षित व सुखकर होणार आहे. नागरिकांनी या कामाबद्दल समाधान व्यक्त करत माजी खासदार अनंतराव देशमुख, ॲड. नकूलदादा देशमुख यांच्या कार्यतत्परतेचे कौतूक केले आहे

# नवनाथ महाराज मूर्तीच्या विटंबना प्रकरणी समाजकंटकावर कठोर कारवाईची मागणी



**रिसोड :** शेगाव तालुक्यातील हिंगणा वैजनाथ येथील नवनाथ महाराजांचा मूर्तीच्या झालेल्या विटंबनेबाबत सकल हिंदू समाज व नाथ समाज आक्रमक झाला असून रिसोड तालुक्यात दि. ४ फेब्रुवारी रोजी जाहीर निषेध मोर्चा काढून आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. हिंगणा वैजनाथ येथील नवनाथ महाराजांच्या मुर्त्यांची विटंबना बाबत निषेध मोर्चा काढण्यात आला.

शेगाव तालुक्यातील हिंगणा वैजनाथ या गावातील सनातन हिंदू धर्मीयांचे आणि नाथसंप्रदायाचे वारकरी संप्रदायाचे, आराध्यदैवत, श्रद्धास्थान, प्रेरणास्थान, पूज्यनीय नवनाथ महाराजांच्या मूर्तीची अज्ञात समाजकंटकांनी विटंबना केली. त्या घटनेचा निषेध व धार्मिक द्वेष करणाऱ्या राष्ट्रद्रोही विचारसरणीच्या व हे अविवेकी कृत्य करणाऱ्या माथेफिरूंना त्वरित शोधून त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करून त्यांना शिक्षा करण्यात यावी. याकरिता सकल हिंदू समाज व नाथ समाज यांच्या संयुक्त विद्यमानाने तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर व ठाणेदार यांना निवेदन सादर करून संबंधित आरोपीच्या विरोधात कठोरात कठोर कारवाइ करण्यात यावी अशी मागणी निवेदनात केली आहे. निवेदन देताना सकल हिंदू समाजाचे असंख्य भक्तगण उपस्थित होते..श.प्र.

# रिसोड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

## रिसोड येथील ॲड शरद मोरे यांचे सुपुत्र यश मोरे लॉ विषयातून नेट उत्तीर्ण

**रिसोड :** :येथील प्रसिद्ध वकील ॲड. शरद विश्वनाथ मोरे यांचे सुपुत्र यश शरद मोरे यांनी विधी (Law)विषयातून राष्ट्रीय पात्रता परीक्षा(NET) उत्तीर्ण करून घवघवीत यश संपादन केले आहे. मूळचे रिसोड तालुक्यातील सवड गावचे रहिवासी असलेले ॲड. शरद विश्वनाथ मोरे हे रिसोड दिवाणी न्यायालयात वकिली व्यवसाय करतात. त्यांचे सुपुत्र यश यांनी देशातील अत्यंत कठीण समजली जाणारी आणि 'युजीसी' (ळउए), नवी दिल्ली यांच्यामार्फत ३१ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेली सहाय्यक प्राध्यापक पदासाठीची राष्ट्रीय पात्रता परीक्षा (ऊं) पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण केली आहे. यश यांनी त्यांचे विधी शाखेतील उच्च शिक्षण पूर्ण केले असून, पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळवल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे. त्यांच्या या यशामुळे रिसोड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



. शरद विश्वनाथ मोरे यांचे सुपुत्र यश शरद मोरे यांनी विधी (Law) विषयातून राष्ट्रीय पात्रता परीक्षा(NET) उत्तीर्ण करून घवघवीत यश संपादन केले आहे. मूळचे रिसोड तालुक्यातील सवड गावचे रहिवासी असलेले ॲड. शरद विश्वनाथ मोरे हे रिसोड दिवाणी न्यायालयात वकिली व्यवसाय करतात. त्यांचे सुपुत्र यश यांनी देशातील अत्यंत कठीण समजली जाणारीआणि 'युजीसा नवी दिल्ली यांच्यामार्फत ३१ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेली सहाय्यक प्राध्यापक पदासाठीची राष्ट्रीय पात्रता परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण केली आहे. यश यांनी त्यांचे विधी शाखेतील उच्च शिक्षण पूर्ण केले असून, पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळवल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. श.प्र.


# बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, वाशिम

**निविदा सुचना क्र. १८ (सन २०२५-२०२६)**

अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, वाशिम हे कामांच्या ब-१ दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या महाटेंडर या संकेतस्थळावर योग्य त्या प्रवर्गातील कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. कामांची निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने सादर करावयाची आहे. निविदेचा विस्तृत नमुना www.mahatenders.com संकेतस्थळावर दिनांक १५/०२/२०२६ ते १२/०२/२०२६ रोजी पर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.

स्वाक्षरीत/-

**कार्यकारी अभियंता (बांध.)**

जिल्हा परिषद, वाशिम

## प्रा. गौतम जाधव हे लोकप्रशासन या विषयातून नेट परीक्षा उत्तीर्ण



रिसोड : बुलढाणा जिल्ह्यातील एका छोट्या सावळी गावचे सुपुत्र आदरणीय प्रा. गौतम तोताराम जाधव हे भारतातली दोन नंबरची अत्यंत अवघड समजली जाणारी यूजीसी न्यू दिल्ली यांनी डिसेंबर २०२५ रोजी सहाय्यक प्राध्यापकासाठी घेतलेली राष्ट्रीय पात्रता परीक्षा नेट. लोकप्रशासन या विषयातून पहिल्याच प्रयत्नात त्यांनी ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

याअगोदर त्यांनी ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातून सुद्धा ही परीक्षा उत्तीर्ण केली होती. त्यांचे शिक्षण एमए लोकप्रशासन, मानसशास्त्र, समाजशास्त्र, ग्रंथालय व माहितीशास्त्र, तसेच एल एल बी हे उच्च शिक्षण घेतले असून. ते बोधिसत्व बोधीवृक्ष बहुउद्देशीय शिक्षण संस्था सावळी या संस्थेचे ते संचालक असून. एक सामाजिक दायित्व म्हणून विदर्भातील शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी उच्च शिक्षणाचे दालन या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून खुले केले आहे. अशा सामाजिक धार्मिक शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यांचा वसा घेतलेले प्रा. गौतम तोताराम जाधव सर यांचे नेट राष्ट्रीयपात्रता परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल सर्वत्र स्तरातून कौतुक होतआहे. श.प्र.

## श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालया मध्ये निरोप समारंभ



रिसोड : श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाकद येथे दि. ०५ फेब्रुवारी २०२५ ला वर्ग ११वी कडून १२वी आणि १०वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ तथा शुभेच्छा समारंभ सकाळी . पार पडला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष . प्रदीपरावजी देशमुख उर्फ नानासाहेब कोषाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिम तथा अध्यक्ष श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाकद कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक. रामेश्वरजी चव्हाण ठाणेदार पोलीस स्टेशन रिसोड ,. अमोलभैया देशमुख सरपंच ग्रा. पं. वाकद सत्कारमूर्ती मोहनराव देशमुख ज्येष्ठ पत्रकार उद्धवराव जटाळे रऊफ भाई उपसरपंच, डॉ. अभय देशमुख,

. प्रतापराव नायक, ग्रामपंचायत सदस्य रामचंद्र अंभोरे, प्रल्हाद बेंडवाले, शिवाजी थोरात, प्राचार्य . सुभाष उमाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.. निरोप समारंभाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रदीपराव देशमुख मुख्य मार्गदर्शक ठाणेदार रामेश्वर चव्हाण, सत्कारमूर्ती मोहनराव देशमुख व मंचावरील सर्व मान्यवरांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी प्रदीपराव देशमुख यांनी आपल्या भाषणातून शाळेच्या प्रगतीबद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधताना जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर अभ्यासा शिवाय पर्याय नाही असा कानमंत्र देऊन येणाऱ्या परीक्षे संदर्भात मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. निरोप समारंभाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना कॉलेजच्या आठवणी शिक्षकांचे मार्गदर्शन कायम स्मरणात राहील असे उद्गार काढले. कार्यक्रमाचे मार्गदर्शक ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी आपल्या भाषणातून शाळेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. पुढे बोलताना विद्यार्थ्यांना त्यांनी करिअर मार्गदर्शन करून यशस्वी होण्याचा कानमंत्र दिला तसेच विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये शिस्त व प्रामाणिकपणा अंगिकारावा असे प्रतिपादन केले.

प्रमुख पाहुणे . अमोल भैया देशमुख यांनी विद्यार्थ्यांना जीवनामध्ये यश मिळवायचे असेल परिश्रमाशिवाय पर्याय नाही कठोर मेहनतिनेच जीवनात यश मिळते. याप्रसंगी . प्रदीपराव देशमुख, ठाणेदार . रामेश्वर चव्हाण , अमोलभैया देशमुख सरपंच, माजी प्राचार्य प्रतापराव नायक, डॉ. अभय देशमुख, किशोर देशमुख रऊफ भाई उपसरपंच, शिवाजी थोरात ग्रा. पं. सदस्य प्रल्हाद बेंडवाले, रामचंद्र अंभोरे प्राचार्य सुभाष उमाळे तसेच शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. खरात यांनी केले. आभार प्रा. अलगुडे यांनी मानले वि. प्र)

## भा.मा. कन्या शाळेच्या विद्यार्थिनींचा निरोप समारंभ



रिसोड : तालुक्यातीलएकमेव मुलींची भा. मा कन्या शाळा असून. ६ फेब्रुवारी रोजी इयत्ता दहावीच्या जवळपास २५० विद्यार्थिनींना निरोप देण्यात आला. या निरोप समारंभाच्या अध्यक्ष प्राचार्या मंजुषा सु. देशमुख , प्रमुख अतिथी पर्यवेक्षक सन्माननीय सुनील इहाळके , जेष्ट क्रीडाशिक्षक सुधीर देशमुख , जेष्ट शिक्षक सचिन महाजन , १०वी च्या वर्ग शिक्षिका निर्मला देशमुख मॅडम, स्मिता चव्हाण या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थिती कार्यक्रम पार पडला असता. सुरुवातीला प्रतिमा पुजनानंतर प्रथमतः विद्यार्थिनींनी सुरेल आवाजात गीत गायन केले त्यामध्ये आरती गायकवाड, प्रशंसा साळवे , किरण कोरडे, संस्कृती पावडे. तसेच मनोगतामध्ये वैशाली जामकर, रूपाली खोडके, अंकिता ढवळे, रिद्धी पुंड, साक्षी खडसे, पुनम वायभासे, अर्पिता लोखंडे, साक्षी गिरी, कृष्णाली सरकटे इत्यादी विद्यार्थ्यांनींनी आपले मनोगत व्यक्त केले .

प्राध्यापिका माजी नगराध्यक्ष विजयमाला आसनकर , व ज्येष्ठ शिक्षक सुधीरदेशमुख , दहावीच्यावर्ग शिक्षिका स्मिता चव्हाण , ज्येष्ठ शिक्षक सचिन महाजन , निर्मला देशमुख या सर्वांनी १० च्या परीक्षेविषयी महत्त्वाच्या सूचना आणि मार्गदर्शन केले. तसेच पालकांमधून आदरणीय खरबळ साहेब पंचायत समिती रिसोड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेचे खूप खूप कौतुक केले. प्राचार्या मंजुषा सु देशमुख मॅडम यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतातून विद्यार्थिनींना आवाहन केले की आपणाला जीवनामध्ये यशस्वी व्हायचे त्याचबरोबर स्वतःचे आणि आई-वडिलांचे नाव सुद्धा आपणाला कमवायचे आहे आपली एक वेगळी ओळख निर्माण करायची आहे. असे सूचक विधान करत दहावीच्या परीक्षेसाठी महत्त्वाच्या टिप्स देत खूप खूप शुभेच्छा दिल्या. विशेष करून या कार्यक्रमाला पाल्यांसोबत पालकांना सुद्धा निमंत्रण देऊन बोलवण्यात आले आणि त्यांच्यासाठी स्वादिष्ट भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. पालकांनी या शाळेच्या आदरातीथ्याबद्दल कौतुक केले व आभार व्यक्त केले. श.प्र.

## एस जी एम पब्लिक स्कूलमध्ये स्नेहसंमेलन उत्साहात



रिसोड : तालुक्यातील मोठेगाव येथील संत गाडगे महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तथा एस. जी. एम. पब्लिक स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले या स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक दत्तराव थांडे हे होते तर उद्घाटक म्हणून रिसोड चे नवनिर्वाचित नगराध्यक्ष भगवान क्षीरसागर हे होते. तर मुख्य मार्गदर्शक म्हणून रिसोड पोलीस स्टेशनचे ठाणेदार रामेश्वरजी चव्हाण हे होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचे रितसर उद्घाटन करण्यात आले.

त्यानंतर मान्यवरांचे सत्कार तसेच भाषणे झाली. त्यानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली आणि शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्टपणे नाटक सादरीकरण करून तसेच विद्यार्थ्यांनी आपले परफॉर्मन्स सादर करून सर्व पालक मंडळी तसेच गावकरी मंडळी यांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांचे अतिशय चांगल्या प्रकारे डान्स हे सर्व शिक्षिका यांनी अतिशय उत्कृष्टपणे बसवले. या कार्यक्रमाला तंटामुक्ती अध्यक्ष संजयराव देशमुख, परभणी चे प्राध्यापक अशोक चाटसे , देवानंद मोरे , जमधाडे , अहमद घनकर मामू, विठ्ठल फुके, काळे , खिलारे सर आदी पाहुणे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागेश सतीश , पट्टेबहादूर टोचर , पंडित उजमा , जिरवनकर , तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे संचालन चाफेश्वर गांगवे यांनी केले तर आभार कानकटाव यांनी मानले. श.प्र.

## श्रीच्या प्रकट दिनानिमित्त महाप्रसादाचे आयोजन



रिसोड : येथील श्री संत गजानन महाराज मंदिर मध्ये गजानन महाराज प्रगट दिन सोहळयाचे निमित्त ८फेब्रुवारी २०२६ ला महाप्रसादाचे आयोजनकरण्यातआलेआहे श्री संत गजानन महाराज मंदिर मध्ये गजानन महाराज प्रगट दिन सोहळयाचे निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन १ फेब्रुवारी २०२६ ते ८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत करण्यात आले यामध्ये संगीतमय श्रीराम कथा पूज्य निरंजन भाईजी महाराज रामायणाचार्य श्रीधाम वृंदावन यांचे दुपारी १ ते ५ पर्यंत संस्थांन चे परिसरात करण्यात आले.

सोबतच संस्थांनमध्ये श्री लक्ष्मीनारायण याग, अखंड हरिनाम सप्ताह तसेच दररोज कीर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले १ फेब्रुवारी २०२६ ला ह. भ. प. रामायणाचार्य गणेश महाराज हुंबाड महागावकर यांचे कीर्तन सोमवार २ फेब्रुवारीला ह भ प विनोदाचार्य तुकाराम महाराज पारधे शिरपूर मंठा, मंगळवार ३ फेब्रुवारी २०२६ ह भ प भागवताचार्य दशरथ महाराज अंभोरे नांदेड, बुधवार ४ फेब्रुवारी २०२० ह भ प भागवताचार्य कृष्णा महाराज मोरे वीरसावंगी मेहकर, ५ फेब्रुवारी २०२६ हभप पूज्य निरंजन भाईजी महाराज रामायणाचार्य वृंदावन, दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ हभप ब्रह्मनिष्ठ रामायणचार्य श्रीनिवास महाराज घुगे, दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ ला ह भ प रामायणाचार्य श्रीराम महाराज कुटे शिवणीकर यांचे कीर्तन संप्पन्न झाले .

संस्थांन मध्ये दिनांक आठ फेब्रुवारी २०२६ ला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे यानिमित्त संस्थांन मध्ये महाप्रसादाची जय्यत तयारी सुरू असून यामध्ये दहा क्विंटल चे बुंदीचे लाडू, २५ क्विंटल गहू, ची पोळी, सहा क्विंटल चा भात, तसेच सात क्विंटल ची भाजी करण्यात येत आहे संस्थांनतर्फे आयोजित केलेल्या महाप्रसादाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन श्री संत गजानन महाराज मंदिर ट्रस्ट रिसोड तर्फे करण्यात आलेआहे (वि. प्र)

## वाकद गावात सरपंच यांनी बसवले चौदा कॅमेरे

### चोरीच्या घटनेते झाली होती वाढ

रिसोडः तालुक्यातील वाकद येथे नुकतीच एक चोरीची घटना घडली याची दखल घेत सरपंच अमोल देशमुख यांनी त्वरित ग्रामपंचायत. च्या माध्यमातून वाकद गावात मोक्याच्या ठिकाणी १४ सीसीटीव्ही कॅमेरे बसवले असून त्यांच्या या . कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे .

वाकद येथे मोठी चोरी झाली असता सरपंच अमोल प्रदीपराव देशमुख यांनी ग्रामपंचायत अंतर्गत होणाऱ्या या सर्व चोऱ्यांना आळा घालण्याकरता तातडीने धाडसी निर्णय घेत मोजे वाकद



या ठिकाणी गावांमध्ये शिरणाऱ्या संपूर्ण रस्त्यांवरती सौर ऊर्जेचे कॅमेरे लावण्याचा धडाडीचा निर्णय घेतला असून त्यांनी संपूर्ण गावांमध्ये १४ कॅमेरे लाऊन चोऱ्यांवर अंकुश लावला यामध्ये वाकद वाडी रस्ता,. गुंजखेड रस्ता, गोहगाव रस्ता. रिसोड मेहकर रस्ता, बस स्टँड ग्रामपंचायत कार्यालयासमोर, जिल्हा परिषद शाळेमध्ये, तळयाच्या पाळू वरती असे विविध ठिकाणी कॅमेरे लावण्यात आले जेणेकरून गावामध्ये होणाऱ्या गैर व्यवहारावरती आळा बसेल व चोरीचे प्रमाण कमी होईल त्यांच्या या निर्णयाचे संपूर्ण गावात कौतुक होत आहे विशेष म्हणजे पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी सुद्धा सरपंच अमोल देशमुख यांच्या या कार्याचे कौतुक केले व प्रत्येक ग्रामपंचायतीने गावाच्या सुरक्षेसाठी असे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे आवाहन केले (वि. प्र)